MHFC060002542024

दाखल दिनांक - ०३.०८.२०२४
नोंदणी दिनांक - ०३.०८.२०२४
निकाल दिनांक - २२.०५.२०२६
कालावधी - ०१ व. ०९ म. १९ दि.

**अलिबाग येथील कौटुंबिक न्यायाधीश, जि. रायगड यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी - सौ. अमृता अ. शिंदे)

**पिटीशन-ई क्र. ३१/२०२४**

नि.क्र. ५८/ब

.... अर्जदार

**विरूध्द**

.... सामनेवाला

**याचिका - भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १४४ (१) (a) (b) प्रमाणे पोटगी मिळण्याकरीता...**

---

अर्जदारांतर्फे विधिज्ञ – श्रीमती तनुष्का पेडणेकर
सामनेवाल्यातर्फे विधिज्ञ – श्री. विश्वनाथ भगत / श्रीमती मेघा पाटील

---

## न्यायनिर्णय

(जाहिर दिनांक २२.०५.२०२६)

अर्जदारांनी प्रस्तुत याचिका भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १४४ (१) (a) (b) प्रमाणे निर्वाह भत्ता/पोटगी मिळण्याकरीता दाखल केली आहे.

अर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे,

२. अर्जदार क्र. १ व सामनेवाला हे नात्याने पती-पत्नी असून त्यांचा विवाह दिनांक ०२.०३.२०१७ रोजी मौजे बांधण, ता. अलिबाग येथे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे संपन्न झाला. अर्जदार क्र. १ व सामनेवाला लग्नाआधीपासून एकमेकांना ओळखत होते. लग्नाआधी तीन महिने उभयतांचा साखरपुडा झाला व त्यावेळी सामनेवाल्याने तिला एक अंगठी व पैंजणचा जोड दिला होता. लग्नानंतर काही दिवस सामनेवाला तिच्याशी चांगले वागला परंतु त्यानंतर त्याने तिच्यावर संशय घेऊन वाद करण्यास सुरूवात केली. सामनेवाल्याच्या आईला अर्जदार क्र. १ आवडत नसल्याने छोट्याछोट्या गोष्टींवरून ती तिच्यासोबत वाद करत असे. सामनेवाल्याच्या आईने तिला माहेरी जायचे नाही अशी सक्त ताकीद दिली होती. सामनेवाल्याची आई ही अर्जदार क्र. १ हिची नात्याने सावत्र मावशी आहे.

३. सामनेवाला एस.टी. महामंडळ, रामवाडी, पेण येथे कामाला असून त्याला दरमहा रक्कम रू. ३०,०००/- ते ३५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीस ते पस्तीस हजार मात्र) इतका पगार आहे. सामनेवाल्याच्या घरी आई, विवाहित भाऊ व

भावजय असे कुटुंब असून अर्जदार क्र. १ हिचा दिर व भावजय पनवेल येथे कामाला आहेत. तिची सासू शेतामधील भाजीपाल्याचे उत्पन्न घेऊन ती विकून स्वत:चा उदरनिर्वाह करते. त्यामुळे सामनेवाल्यावर अर्जदार क्र. १ व कु. तन्वी यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणाचीही जबाबदारी नाही. सामनेवाल्यास जुगाराचे वेड असल्याने तो मिळालेला सर्व पैसा जुगारावर उडवतो.

४. अर्जदार क्र. १ हिने सासूच्या त्रासाला कंटाळून अंगावर रॉकेल ओतून घेतले होते व त्यावेळी तिच्या आईने तिला वाचवले. सामनेवाला लग्नानंतर एक महिन्याने दारू पिऊन आल्याने त्याच्या दारूच्या व्यसनाबाबत अर्जदार क्र. १ हिला समजले. तिने त्याला अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न केला परंतु, त्याच्या स्वभावात कोणताही बदल झाला नाही. उलट तो तिच्यावर जास्तच संशय घेत असे. अर्जदार क्र. १ हिला दिवस गेल्यानंतर तिने सामनेवाल्यास दारू पिणे बंद करण्यास सांगितले परंतु, त्याने तिचे ऐकले नाही. दिनांक १८.०८.२०१८ रोजी कु. तन्वी हिचा जन्म झाला. त्यानंतरही सामनेवाल्याने अर्जदार क्र. १ हिची व बाळाची जबाबदारी स्विकारली नाही. अर्जदार क्र. १ हिने तिच्या आईच्या मदतीने सन २०२१ मध्ये पार्लर सुरू केले. त्यावेळी सामनेवाल्याने तिला 'तू पार्लर चालवायचे नाहीस आणि चालू केलेस तर तू तुझा फोन कायम चालू ठेवायचास' अशी धमकी दिली. सामनेवाला अर्जदार क्र. १ आणि कु. तन्वी यांना मारहाण करत असे.

५. अर्जदार क्र. १ हिच्या आईकडे मुलीला घेऊन गेल्यानंतर सामनेवाला तिला शिविगाळी करत असे. सामनेवाला शिविगाळी करत असल्याने व साध्यासाध्या गोष्टींवरून वाद करत असल्याने अर्जदार क्र. १ हिने दिनांक ३०.०४.२०२३ रोजी दादर पोलीस ठाण्यात त्याच्याविरूध्द तक्रार दाखल केली. परंतु, त्यानंतरही सामनेवाल्याच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही. उलट त्याने अजून अर्जदारांना मारहाण करण्यास सुरूवात केली. सामनेवाला अर्जदार क्र. १ हिच्या

पार्लरमध्ये जाऊन तमाशा करत असे व त्यामुळे तिला लोकांसमोर लाजिरवाणे वाटत असे. सामनेवाल्याने तिला 'मी मरून जाईल, तुझी वाट लावेल' अशी धमकी दिली व तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्याबाबत अर्जदार क्र. १ हिने दिनांक २०.०४.२०२४ रोजी पोयनाड पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. सामनेवाल्याने कधीही अर्जदार क्र. १ व कु. तन्वी यांची जबाबदारी स्विकारलेली नाही. कु. तन्वी ६ वर्षांची असून शाळेत शिकत आहे. सामनेवाल्याने कधीही तिला प्रेम दिले नाही. अर्जदार क्र. १ कु. तन्वी हिच्यासह तिच्या आईकडे राहात आहे. अर्जदार क्र. १ हिचे पार्लर बंद झाले असल्यामुळे त्या दोघींची जबाबदारी तिच्या आईवर आहे. अर्जदार क्र. १ कु. तन्वीला घेऊन तिच्या आईकडे मुंबई येथे राहायला गेली असता सामनेवाल्याने तेथे जाऊनही तमाशा केला व अर्जदार क्र. १ हिला जिवाचे बरेवाईट करण्याची धमकी दिली. त्यानंतर दिनांक १३.०६.२०२४ रोजी एका स्टॅम्प पेपरवर सर्व चूका मान्य करून अर्जदार क्र. १ हिच्यासोबत पुन्हा असे न वागण्याचे लिहून दिले. परंतु, असे असूनही सामनेवाल्याने अर्जदार क्र. १ हिला फोनवर पुन्हा शिव्या दिल्या. सामनेवाला याच्या स्वभावात कोणताही बदल होणार नसल्याची अर्जदार क्र. १ हिची खात्री झाली आहे. अर्जदार क्र. १ व २ यांची जबाबदारी सामनेवाल्याची असल्याने अर्जदार क्र. १ व २ यांनी सामनेवाल्याकडून दरमहा प्रत्येकी रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा हजार मात्र) इतक्या पोटगीची मागणी केली आहे. सबब, अर्जदारांनी प्रस्तुतची याचिका दाखल केली आहे.

६. सामनेवाल्याने प्रस्तुत याचिकेस नि.क्र. १६ कडे म्हणणे दाखल करून याचिकेतील कथने खोटी व खोडसाळ असल्याचे कथन केले आहे. सामनेवाल्याच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ स्वत: घर सोडून निघून गेली आहे. त्याने अर्जदार क्र. १ हिला कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. अर्जदार क्र. १ हिचे चालचलन ठिक नसल्यामुळे व त्याची प्रचिती सामनेवाल्यास वारंवार आल्यामुळे ती सामनेवाल्याचे घर

सोडून स्वत: निघून गेली आहे. लग्नानंतर काही दिवसांनी सामनेवाला तिच्यावर संशय घेऊ लागल्याचे तिचे कथन चुकीचे आहे. सामनेवाला व अर्जदार क्र. १ यांच्या लग्नानंतर त्याची मोठी बहिण व छोटा भाऊ यांचे एकाच दिवशी म्हणजेच दिनांक २२.०५.२०१७ रोजी लग्न असल्याने घरातील सर्वजण सदर लग्नाची तयारी करत होते. अर्जदार क्र. १ हिचे पार्लरचे शिक्षण झाल्यामुळे तिला पार्लर सुरू करायचे होते व त्यासाठी सामनेवाल्याने पेझारी साई मंदिराशेजारी त्याच्या ओळखींच्या गाळ्यामध्ये एक गाळा भाड्याने घेऊन दिला. तसेच, सदर गाळ्यामध्ये तिला पार्लरसाठी लागणारे सर्व फर्निचर देखील करून दिले. त्याचप्रमाणे सदर पार्लरमध्ये स्त्रिया व मुलींचे कपडे व इमिटेशन ज्वेलरी ठेवणार असल्याने सदरचे सामान मुंबई येथून आणण्याकरीता देखील सामनेवाल्याने तिला परवानगी दिली होती. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिने 'पूजा पार्लर ॲन्ड नॉव्हेल्टी' नावाने दुकान सुरू केले.

७. सामनेवाल्याच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ जसे तिचे ग्राहक असतील त्याप्रमाणे रात्री १०.३० ते ११.०० वाजेपर्यंत पार्लरमध्ये काम करत असे. सामनेवाला संध्याकाळी ६.०० वाजता कामावरून परत येत असताना कु. तन्वी हिला घेऊन येत असे व रात्री अर्जदार क्र. १ हिने फोन केल्यानंतर तिला घेण्यासाठी जात असे. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिने पार्लरबाहेर फळे तसेच भाजी विकण्याबाबत त्याला सांगितले असता त्यासही त्याने संमती दिली व तशी भाजी व फळे तिला आणून देऊन तो कामाला जात असे. त्यामुळे सामनेवाला तिच्यावर संशय घेत असल्याचे तिचे कथन खोटे आहे. अर्जदार क्र. १ ही नात्याने सामनोवल्याची मावस बहिण लागत असल्याने सदरचे लग्न केल्यास कुटुंबात बोल लावतील ही भिती त्याच्या आईला असल्याने तिचा सदर लग्नास विरोध होता. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही सामनेवाल्याच्या आईला आवडत नसल्याचे तिचे विधान खोटे आहे. तसेच, त्याच्या आईने तिला माहेरी न जाण्याची ताकीद दिल्याचे कथन देखील खोटे आहे. उलट, अर्जदार क्र. १

तिला हवे तेव्हा तिच्या माहेरी जाऊन तिला पाहिजे तेवढे दिवस राहिली आहे. काही वेळा सामनेवाला स्वत: तिला माहेरी घेऊन जात असे.

८. सामनेवाल्याच्या कथनानुसार तो एस.टी. महामंडळ, रामवाडी, पेण येथे कामाला आहे परंतु त्याला दरमहा रक्कम रू. ३०,०००/- ते ३५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीस ते पस्तीस हजार मात्र) इतका पगार असल्याचे अर्जदार क्र. १ हिचे कथन चुकीचे आहे. सामनेवाल्याच्या कथनानुसार त्याने घर बांधण्यासाठी काढलेल्या कर्जाचे व बहिणीच्या लग्नाच्या वेळी काढलेल्या कर्जाचे हप्ते त्याच्या पगारामधून भरावे लागतात. त्याची आई भाजीपाला विकून उत्पन्न कमवत असल्याचे अर्जदार क्र. १ हिचे कथन खोटे व चुकीचे आहे. सामनेवाल्याची आई शेतामध्ये भाताची लागवड करते व आलेले भाताचे पिक घरामध्ये वापरले जाते. अर्जदार क्र. १ पार्लरचा व्यवसाय करून तसेच, स्त्रियांचे व लहान मुलांचे कपडे आणि इमिटेशन ज्वेलरी विकून तसेच भाज्या व फळे विकून त्याचप्रमाणे अर्जदार क्र. १ लग्न, साखरपुडा तसेच इतर कार्यक्रमाच्या वेळी करण्यात येणारे स्त्रियांचे मेकअप करून, हेअरस्टाईलच्या ऑर्डर स्विकारून दरमहा रक्कम रू. ४०,०००/- ते ५०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चाळीस ते पन्नास हजार मात्र) इतके उत्पन्न कमवते.

९. सामनेवाल्यास जुगाराचे व्यसन असून तो मिळणार पगार जुगारावर उडवत असल्याचे अर्जदार क्र. १ हिचे कथन चुकीचे आहे. अर्जदार क्र. १ हिने सासूच्या त्रासाला कंटाळून अंगावर रॉकेल ओतून घेतले होते व त्यावेळी तिच्या आईने तिला वाचवल्याचे अर्जदार क्र. १ हिचे कथन खोटे आहे. केवळ त्याच्या आईवर गंभीर आरोप करण्यासाठी अर्जदार क्र. १ हिने सदरचे वक्तव्य केले आहे. अर्जदार क्र. १ नेहमी त्याच्या आईचा राग करत असे व सतत तिचा अपमान करत असे. तिने त्याच्या आईला 'मी तुझ्या मुलाला तुझ्यापासून तोडेन' असे सांगितले होते. लग्नानंतर साधारण तीन वर्षातच तिने वेगळे राहण्यास सुरूवात केली होती. अर्जदार क्र. १ हिने कधीही

घरी आलेल्या पाहुण्यांचा पाहुणचार देखील केला नाही. सामनेवाल्याने माहे सप्टेंबर २०२२ पर्यंत दारूला स्पर्श केला नव्हता.

१०. सामनेवाला अर्जदार क्र. १ हिच्यावर संशय घेत असल्याचे कथन खोटे आहे. उलट माहे सप्टेंबर-२०२२ मध्ये अर्जदार क्र. १ हिचे दुसऱ्या व्यक्तीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याची माहिती त्याला मिळाली होती. अर्जदार क्र. १ हिच्या मोबाईलवरील दत्ता या इसमासोबतच्या व्हॉट्सअॅप मेसेजबाबत तिला विचारणा केली असता तिने त्याबाबत मान्य केले होते. त्याबाबत सामनेवाल्याने पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार केली असता तिने तिची चूक मान्य करून यापुढे असे वागणार नसल्याची हमी दिली होती. अर्जदार क्र. १ हिला दिवस गेल्याचे समजल्यानंतर सामनेवाला व त्याची आई दोघेही आनंदात होते. त्यामुळे सदर बातमी कळल्यानंतर तिच्यातील व त्याच्या आईमधील वाद वाढत गेल्याचे तिचे कथन खोटे आहे. सामनेवाल्याने तिची व बाळाची जबाबदारी स्विकारली नसल्याचे कथन देखील खोटे आहे. सामनेवाला अर्जदार क्र. १ त्याच्यासोबत राहात नसली तरीही कामावरून घरी परत येताना अर्जदार क्र. १ हिच्या पार्लरबाहेर आवाज देऊन कु. तन्वी हिला काय हवे नको ते पाहूनच घरी येतो. अर्जदार क्र. १ मुलीसह तिच्या आईकडे गेल्यानंतर सामनेवाला तिला शिविगाळी करत असल्याचे कथन देखील चुकीचे आहे. सामनेवाल्याने कधीही तिच्या पार्लरसमोर जाऊन तमाशा केलेला नाही अगर तिला कधीही धमकी दिलेली नाही. सामनेवाला त्याच्या लहान भावासोबत अर्जदार क्र. १ हिची समजूत काढून तिला परत आणण्याकरीता मुंबई येथे गेला असता तिने त्याला 'तू मला मी सांगेन तसे लिहून दे तरच मी तुझ्यासोबत येईन' असे सांगितले व त्याप्रमाणे सामनेवाल्याने लिहून दिले होते.

११. सामनेवाल्याचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ सामनेवाल्यास सोडून राहात आहे. तिला तिच्या व्यवसायातून दरमहा रक्कम रू. ४०,०००/- ते

५०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चाळीस ते पन्नास हजार मात्र) इतके उत्पन्न मिळते. तिने स्वत:हून सामनेवाल्याचा त्याग केला आहे. सबब, याचिका फेटाळण्याची विनंती केली आहे.

१२. सदर प्रकरणात समुपदेशनाचे प्रयत्न करण्यात आले. त्याचा अहवाल नि.क्र. १० कडे आहे. सदर प्रकरणात उभयतांमध्ये तडजोड होऊ शकली नाही.

१३. प्रस्तुत याचिकेच्या न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे विश्लेषण, कारणमिमांसा व निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सामनेवाल्याने अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचे अर्जदार शाबित करतात काय ? | .. | होकारार्थी |
| २. | सामनेवाल्यास उत्पन्नाचे पुरेसे साधन असूनही त्याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नसल्याचे अर्जदार शाबित करतात काय ? | .. | होकारार्थी |
| ३. | अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | .. | अंशतः होकारार्थी, अंतिम आदेशाप्रमाणे |
| ४. | आदेश काय ? | .. | याचिका अंशतः मंजूर |

१४. याचिकेतील कथनांच्या समर्थनार्थ अर्जदार क्र. १ हिने तिच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. ११ कडे दाखल करून कागदोपत्री पुरावा म्हणून उभयतांच्या लग्नाची पत्रिका नि.क्र. ५१ कडे, दिनांक ३०.०४.२०२३ रोजी दादर पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रार अर्जाची प्रत नि.क्र. ५४ कडे, दिनांक

२०.०४.२०२४ रोजी पोयनाड पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रार अर्जाची प्रत नि.क्र. ५५ कडे, सामनेवाल्याने दिनांक १३.०६.२०२४ रोजी अर्जदार क्र. १ हिला लिहून दिलेल्या माफीनाम्याची सत्यप्रत नि.क्र. ५६ कडे दाखल करून पुरावा बंद केला आहे. याउलट, सामनेवाल्याने स्वत:ला नि.क्र. ३३ कडे शपथेवर तपासले आहे व सा.क्र. २ म्हणून सौ. ज्योती राकेश पाटील यांना नि.क्र. ४२ कडे आणि सा.क्र. ३ श्री. शिरीष सदानंद पाटील यांना नि.क्र. ४३ कडे तपासून कागदोपत्री पुरावा म्हणून माहे मे-२०२५ व एप्रिल-२०२५ च्या पगारपत्राची प्रत एकत्रितपणे नि.क्र. ५७ कडे दाखल करून पुरावा बंद केला आहे. अर्जदारांतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाल्यातर्फे दाखल करण्यात आलेल्या लेखी युक्तीवाद (नि.क्र. ५०) चे अवलोकन केले.

## <u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्र. १</u> -

१५. अर्जदार क्र. १ हिने याचिकेतील कथने शाबित करण्यासाठी नि.क्र. ११ कडे स्वतःस शपथेवर तपासून अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. सामनेवाल्यातर्फे घेण्यात आलेल्या सविस्तर उलटतपासामध्ये अर्जदार क्र. १ हिने ती सामनेवाल्यास लहानपणापासून ओळखत असल्याचे, तिचा सामनेवाल्यासोबत प्रेमविवाह असून लग्नाच्या वेळी सामनेवाल्याचे घर ब-यापैकी मोठे असल्याचे, लग्नानंतर तिला स्वतंत्र खोली देण्यात आल्याचे कथन केले आहे. त्यांचे लग्न झाल्यानंतर दोन महिन्यांनी सामनेवाल्याचा भाऊ व बहिण यांचेही लग्न असल्याचे, लग्नानंतर ती सणांकरीता माहेरी जात असल्याचे तसेच, इतर दु:खद प्रसंगी देखील ती माहेरी जात असल्याचे तिने मान्य केले आहे. लग्नाआधी तिने ब्युटीपार्लरचा कोर्स केला होता व तिला शिवणकामही येत असल्याचे ती कथन करते. त्यांच्या लग्नानंतर दोन महिन्यांनी सामनेवाल्याच्या भावाचे व बहिणीचे लग्न असल्याने घरामध्ये धावपळ सुरू असल्याचेही

तिने मान्य केले आहे. लग्नानंतर एक महिन्याने सामनेवाल्याने दारू प्यायल्याचे समजल्यानंतर त्यांच्यातील नातेसंबंध खराब झाल्याचे कथन करून सामनेवाल्याच्या दारू पिण्याच्या सवयीमुळेच त्यांच्यातील नातेसंबंधात कटुता आल्याचे तिने मान्य केले आहे.

१६. अर्जदार क्र. १ हिच्या पुढील उलटतपासामध्ये सन २०२१ मध्ये सामनेवाल्याने तिला ब्युटीपार्लर सुरू करण्यासाठी दुकान गाळा शोधून दिल्याचे मान्य केले आहे. तिच्या पार्लरमध्ये मी महिलांचे कपडे देखील विक्री करण्यासाठी ठेवत असल्याचे तसेच, ती त्यामध्ये इमिटेशन ज्वेलरीचीही विक्री करत असल्याचे सूचक तिने नाकारलेले आहे. तिच्या पार्लरच्या व्यवसायानंतर तिने काही दिवसांकरीता भाजी विक्रीचा व्यवसाय केल्याचे कथन केले आहे. सन २०२२ मध्ये तिचे विवाहबाह्य संबंध आहेत या कारणावरून आमच्यात भांडण झाल्याचे, सामनेवाल्यास तिचे विवाहबाह्य संबंध आहेत असे समजल्यावर सामनेवाला व त्याचे नातेवाईक पोलीस ठाण्यात गेल्याचे व सदर ठिकाणी ज्या मुलासोबत विवाहबाह्य संबंध होते तो मुलगा, त्याची आई व बहिण हे देखील हजर असल्याचे तिने मान्य केले आहे. पोलीस ठाण्यामध्ये त्यांचे जाबजबाब नोंदवण्यात आले व त्यावेळेस तिने तिला सामनेवाल्यासोबत संसार करायचा आहे असे मान्य केल्याचे कथन करून त्यावेळेस तिने सामनेवाल्याची माफी मागून तिला सामनेवाल्यासोबत संसार करावयाचा आहे असे मान्य केल्याचेही मान्य केले आहे. तिचे व तिच्या सासूचे पटत नसल्याने ते स्वतंत्र राहात असल्याचेही तिने मान्य केले आहे. ती ब्युटीपार्लरच्या कामाकरीता सकाळी ११.०० वाजता जाऊन रात्री ७.०० ते ८.०० वाजता परत येत असे. ती चालवत असलेले ब्युटीपार्लरची जागा सध्या सामनेवाल्याच्या नातेवाईकांची आहे परंतु, सदर ब्युटीपार्लर तिची मैत्रिण चालवत असल्याचे कथन केले आहे. सदर ब्युटीपार्लर तिची मैत्रिण चालवत असल्याबाबत तिने कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

१७. अर्जदार क्र. १ हिने तिच्या पुढील उलटतपासात सामनेवाला कमावत असलेल्या उत्पन्नामध्येच ती घरखर्च चालवत असल्याबाबत मान्य करून पार्लरचा ताबा तिच्या मैत्रिणीकडेच असल्याचे, पार्लरची चावी मैत्रिणीकडे असून तिच पार्लर उघडते व बंद करत असल्याचे, पार्लरचे भाडे तिची मैत्रिण भरत असल्याचे, तिची मैत्रिण तिला जमेल तसे रोख किंवा ऑनलाईन पध्दतीने मोबदला देत असल्याचे, लग्नाचा सिझन असल्यास तिची मैत्रिण पार्लरमध्ये मदतीकरीता बोलावत असल्याचे, पार्लरमध्ये तितक्याशा अपॉईंटमेंट नसल्याचे कथन करून तिचे ठरलेले ग्राहक देखील पार्लरमध्ये येत असल्याचे तिने मान्य केले आहे.

१८. अर्जदार क्र. १ हिच्या उलटतपासात पुढे असे आले आहे की, जयश्री राकेश पाटील व ज्योती या दोघी सदर पार्लर चालवतात. ज्योती व जयश्री या पेझारी येथे राहण्यास आहेत. त्या पार्लरपासून थोड्या अंतरावर राहतात. तिच्यामध्ये व तिच्या मैत्रिणीमध्ये पार्लर चालवण्याबाबत कोणताही करार झालेला नाही. तिने तिच्या मैत्रिणीस पार्लर चालवण्यास दिल्याबाबत गाळा मालकास माहिती दिलेली नाही. सदर पार्लरच्या गाळा मालकास पार्लर तिची मैत्रिण चालवत असल्याबाबत माहिती असल्याचे तिने कथन केले आहे. तिचे लग्न झाल्यानंतर एक ते दिड महिन्यात तिच्या भावाचे लग्न होते व त्यावेळेस घरच्यांना मदत करण्यासाठी ती माहेरी गेली असल्याचे तिने मान्य केले आहे. सामनेवाल्याच्या भावाच्या लग्नाचे आमंत्रण देण्याकरीता मी माहेरी गेली असल्याचे तिने मान्य केले आहे. ती सामनेवाल्यास विचारून माहेरी गेली होती. तिच्या लग्नानंतर तिच्या दिराचे व नणंदेचे लग्न असल्याने त्यावेळेस नातेवाईक देखील घरात असल्याचे तिने मान्य केले आहे. घरातील कामे ते सर्व मिळून करत होते परंतु तिच्यावर घरातील झाडू मारणे, कपडे धुणे यासारखी कामे टाकली जात असल्याचे तिचे कथन आहे. सन २०२१ पासून ती सासूच्या त्रासास कंटाळून वेगळे राहायला लागली. तिने तिच्या अंगावर रॉकेल ओतून घेतल्याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार केली

नाही. तिने अंगावर रॉकेल ओतून घेतल्यानंतर तिला शारिरीक त्रास झाला होता परंतु त्याबाबत तिने वैद्यकिय उपचार घेतले नाही.

१९. कोणत्या तारखेस ती सामनेवाल्यास सोडून माहेरी गेली ती तारीख तिला आठवत नाही, त्यावेळेस तिच्यात व सामनेवाल्यामध्ये भांडण झाले होते. त्यानंतर त्यांनी एकमेकांच्या कुटुंबियांना घेऊन समझोता करण्याचा प्रयत्न केला नाही. माहेरी निघून जाऊन स्वतंत्र राहण्याचा तिचा वैयक्तिक निर्णय आहे. ती माहेरी गेल्यानंतर तिने परत येण्याकरीता सामनेवाल्याने तिला ब-याच विनवण्या केल्या होत्या. तिने परत यावे याकरीता सामनेवाला व त्याचा भाऊ त्यांच्या घरी बोलणी करण्यासाठी आले असल्याचे तसेच, तिने परत नांदायला यावे याकरीता सामनेवाल्याने प्रयत्न केल्याचे तिने मान्य केले आहे. तिने सामनेवाल्यास फोनवर त्याने सर्व अटी लिहून दिल्यास ती नांदण्यास येईन असे सांगितल्याचे व स्टॅम्प पेपरमधील मजकूर तिने सामनेवाल्यास लिहून देण्यास सांगितल्याचे नाकारले आहे.

२०. दागिने सोडून सर्व सामान सामनेवाल्याकडून ती घेऊन गेली असल्याचे व कपाटाच्या चाव्या तिच्याकडेच असल्याचे व ती घरातून निघून जाताना कपाटाच्या चाव्या तिच्यासोबत घेऊन गेल्याचे तिने मान्य केले आहे. सामनेवाल्याने मारहाण केल्याबाबत तिने तिच्या जावेस फोनवर सांगितले होते. तिने सामनेवाल्याच्या त्रासास कंटाळून स्वतंत्र राहण्याचा निर्णय स्वत: घेतला आहे. तिच्या माहेरच्या लोकांनी त्यांचा संसार टिकावा म्हणून आधी प्रयत्न केले होते. कु. तन्वी हिच्या बारशाच्या कार्यक्रमाच्या वेळेस ते एकत्र राहात होते. त्यावेळेस कु. तन्वी हिला दिलेल्या भेटवस्तू तिच्या व सामनेवाल्याच्या ताब्यात असल्याचे तिने नाकारले आहे. सामनेवाल्याच्या उत्पन्नाबाबत तिला तितकीशी माहिती नसल्याचे व लग्न झाले त्यावेळेस सामनेवाला किती उत्पन्न कमवत होता हे तिला माहिती नसल्याचे तिने कथन केले आहे.

२१. सामनेवाल्याने नि.क्र. ३३ कडे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करून त्याच्या म्हणण्यातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. अर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या सविस्तर उलटतपासामध्ये सामनेवाल्याने त्यांच्या लग्नास त्याच्या आईचा विरोध असल्याचे, मान्य केले आहे. सन २००५ मध्ये तो अलिबाग एस.टी. डेपोमध्ये मेकॅनिक म्हणून नोकरीस लागल्याचे, त्यावेळेस त्याला दरमहा साधारण रक्कम रू. १,८००/- (अक्षरी रक्कम रूपये एक हजार आठशे मात्र) इतका पगार असल्याचे व दरवर्षी त्याचा पगार वाढत गेल्याचे त्याने कथन केले आहे. तो अर्जदार क्र. १ हिला दरमहा रक्कम रू. २,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन हजार मात्र) देत असे व घरातील इतर सर्व खर्च करत असे. अर्जदार हिच्या पार्लरचे भाडे तो देत असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुत प्रकरणी दाखल केला नाही. पार्लरमधील सामान त्याने मित्रांच्या मदतीने तयार केल्याचे व त्याने अर्जदार क्र. १ हिला पार्लरचे सामान आणण्याकरीता पैसे दिले नसल्याचे, पूर्वी कधीतरी तो मोबाईलवर पैसे देऊन रमी खेळत असल्याचे, त्याच्यात व अर्जदार क्र. १ मध्ये संशयावरून वाद होत असल्याचे, अर्जदार क्र. १ हिने पार्लरचा बेसिक कोर्स केल्याचे त्याने मान्य केले आहे.

२२. सामनेवाल्याच्या पुढील उलटतपासामध्ये त्याने त्याच्या वडीलांची गावी सामाईक शेती असून त्यामधून भाताचे पिक घेतले जात असल्याचे कथन केले आहे. दिनांक १३.०६.२०२४ रोजी त्याने माफीनामा लिहून दिल्याबाबत प्रश्न विचारला असता त्याने त्यास माफीनामा लिहून दिल्यास अर्जदार क्र. १ नांदायला येण्याबाबत विचार करेल असे त्याला सांगण्यात आल्याने त्याने माफीनामा लिहून दिल्याचे कथन केले आहे. दिनांक २०.०४.२०२४ रोजी त्याने पोलीस ठाण्यामध्ये जाऊन तो पुन्हा असे वागणार नाही व अर्जदार क्र. १ हिला मारहाण करणार नाही असे सांगितले असल्याचे, अर्जदार क्र. १ हिचे दत्ता अगर अन्य इसमासोबत विवाहबाह्य संबंध असल्याबाबतचा पुरावा मी न्यायालयात दाखल केला नसल्याचे, त्याने घेतलेले कर्ज व

त्याच्या परतफेडीपोटी तो पैसे भरत असल्या संदर्भातील कागदोपत्री पुरावा त्याने दाखल केला नसल्याचे त्याने मान्य केले आहे. तसेच, त्याने अर्जदार क्र. १ हिला पुन्हा नांदायला नेण्याकरीता कोणतीही कायदेशिर प्रक्रिया केली नसल्याचे मान्य केले आहे. उर्वरित सर्व सूचके त्याने नाकारलेली आहेत.

२३. सामनेवाल्यातर्फे तपासण्यात आलेल्या सा.क्र. २ श्रीमती ज्योती या अर्जदार क्र. १ हिची मैत्रिण असून ती तिला दोन-तीन वर्षांपासून ओळखते. ती नॉवेल्टीचे दुकान साई मंदिर, पेझारी येथे चालवत असून ते तिचे स्वत:चे नाही. सदर दुकान शिरीष पाटील यांच्या मालकीचे आहे व ते त्यांनी अर्जदार क्र. १ हिला चालवण्यास दिले होते व अर्जदार क्र. १ हिच्यामार्फत ती दुकान चालवते. सदर दुकानामध्ये पार्लरचे काही काम आल्यास ती अर्जदार क्र. १ हिला बोलावून घेते. अर्जदारतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने पार्लरमध्ये काही ग्राहक आले तरच ती अर्जदार क्र. १ हिला कामासाठी बोलावून घेत असल्याचे मान्य करून ती अर्जदार क्र. १ हिला नियमितपणे कामासाठी बोलावत नसल्याचे कथन केले आहे. ग्राहक कमी असल्याने अर्जदार क्र. १ हिला खूप काही उत्पन्न मिळत नसल्याचेही तिने मान्य केले आहे.

२४. सामनेवाल्यातर्फे तपासण्यात आलेल्या सा.क्र. ३ श्री. शिरीष यांच्या पुराव्यात असे आले आहे की, पूजा पार्लर नावाच्या दुकानाचे ते मालक आहेत, सदर पार्लरची चावी त्यांनी सामनेवाल्यास दिली आहे, सदर पार्लर सध्या नियमितपणे अर्जदार उघडते, सदर दुकानाचे फक्त लाईट बिल अर्जदार क्र. १ देते व सदर दुकानाची चावी तिच्याकडे आहे. अर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने सामनेवाला नात्याने त्यांचा चुलत पुतण्या असल्याचे, सदर पार्लर अर्जदार क्र. १ चालवत असल्याचे कथन करून सदर पार्लरमध्ये नॉव्हेल्टी वस्तू देखील विक्रीकरीता ठेवल्याचे मान्य केले आहे. अर्जदार क्र. १ व सामनेवाला

यांच्यातील वैवाहिक वादाबाबत त्यांना ऐकिव माहिती आहे. सामनेवाला सदर दुकानात जाऊन अर्जदार क्र. १ हिच्यासोबत सतत भांडण करत असल्याबाबत त्यांना माहिती नाही. उर्वरित सर्व सूचके त्यांनी नाकारली आहेत.

२५. पटलावरील पुरावा विचारात घेता असे निदर्शनास येते की, अर्जदार क्र. १ हिने ती सामनेवाल्यासोबत एकत्र कुटुंबात राहात असताना सामनेवाल्याची आई करत असलेल्या छळाबाबत तसेच सामनेवाला दारू पिऊन येत असल्याबाबत व तिच्यावर संशय घेत असल्याबाबत कथने नमुद केलेली आहेत. अर्जदार क्र. १ हिने सामनेवाला व त्याच्या कुटुंबियांवरील आरोप शाबित करण्याकरीता तोंडी कथने केली आहेत. वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, अर्जदार क्र. १ व सामनेवाला आणि त्याच्या कुटुंबियांसोबतचे नातेसंबंध हे ताणलेल्या स्वरूपाचे असल्याने दिनांक २५.०३.२०२४ पासून अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ सोबत तिच्या माहेरी राहात आहे. त्याचप्रमाणे नि.क्र. ५४ व ५५ कडील तक्रारींचे अवलोकन करता सामनेवाल्याने अर्जदार क्र. १ हिला शिविगाळी करून स्वत:च्या जिवाचे बरेवाईट करण्याची धमकी दिल्याचे तसेच तिला हाताबुक्क्यांनी मारहाण करून तिला ठार मारण्याची धमकी दिल्याचे दिसून येते. नि.क्र. ५६ कडील माफीनाम्याचे अवलोकन करता सामनेवाल्याने तो कोणतेही व्यसन करणार नसल्याचे, तिला मारणार नसल्याचे, तिच्यावर संशय घेणार नसल्याचे लिहून दिल्याचे दिसून येते.

२६. सामनेवाल्याने उलटतपासामध्ये तो अर्जदार क्र. १ हिला दरमहा रक्कम रू. २,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन हजार मात्र) देत असल्याचे व घरातील इतर सर्व खर्च करत असल्याचे कथन केले आहे परंतु त्याबाबतचा कोणताही पुरावा त्याने अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच, त्याने सुरूवातीला मुलीच्या शिक्षणाची फी भरली परंतु नंतर त्याने फी भरली नसल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे त्याने उलटतपासामध्ये त्याने अर्जदार क्र. १ हिला दैनंदिन खर्चाकरीता कोणतीही रक्कम ती

वेगळी राहात असल्यापासून दिलेली नसल्याचेही मान्य केले आहे. अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची जबाबदारी सर्वस्वी सामनेवाल्याचीच आहे. परंतु, सामनेवाल्याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरीता तसेच अर्जदार क्र. २ हिच्या शैक्षणिक, वैद्यकिय आणि इतर अनुषंगिक खर्चाकरीता कोणतीच आर्थिक तरतुद केली नसल्याचे निदर्शनास येत आहे व त्यामुळे अर्जदार क्र. १ हिला प्रस्तुत याचिका दाखल करणे भाग पडले आहे.

२७. सामनेवाल्याचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ हिचे विवाहबाह्य संबंध आहेत. यासंदर्भात सामनेवाल्यातर्फे विधिज्ञांनी अर्जदार क्र. १ हिचा सविस्तर उलटतपास नोंदवलेला आहे. सदर उलटतपासाचे अवलोकन करता अर्जदार क्र. १ हिने असे मान्य केले आहे की, सन २०२२ मध्ये तिचे विवाहबाह्य संबंध आहेत या कारणावरून त्यांच्यात भांडण केले होते. सामनेवाल्यास तिचे विवाहबाह्य संबंध आहेत असे समजल्यावर सामनेवाला व त्याचे नातेवाईक पोलीस ठाण्यात गेले होते व सदर ठिकाणी ज्या मुलासोबत विवाहबाह्य संबंध होते तो मुलगा, त्याची आई व बहिण हे देखील हजर होते. पोलीस ठाण्यामध्ये त्यांचे जाबजबाब नोंदवण्यात आले व त्यावेळेस तिला सामनेवाल्यासोबत संसार करायचा आहे असे मान्य केले होते. त्यावेळेस तिने सामनेवाल्याची माफी मागून तिला सामनेवाल्यासोबत संसार करावयाचा आहे असे मान्य केले. परंतु, तिच्यासोबत असलेल्या मुलाने तिच्यासोबत राहण्यास नकार दिल्याने तिने सामनेवाल्यासोबत संसार करण्याची तयारी दर्शवली होती ही बाब तसेच, पोलीस ठाण्यामध्ये जाबजबाब नोंदवल्यानंतर तीन दिवसांनी तिने सदर मुलास लग्नास नकार का दिला अशा मजकुराचा मेसेज पाठवला होता व तिने व्हॉट्सॲपवरून केलेले चॅटींग व मेसेज हे नव-यासोबतच्या संभाषणासारखे होते ही बाब नाकारलेली आहे.

२८. सामनेवाल्याने अर्जदार क्र. १ हिचे विवाहबाह्य संबंध असल्याचे नमुद केले असले तरी सामनेवाल्याने सदर इसम कोण होता तसेच, विवाहबाह्य संबंधाबाबत

काय घटना घडली याचे कोणतेही विश्लेषण केल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे अर्जदार क्र. १ ही सद्यस्थितीमध्ये विवाहबाह्य संबंधामध्ये राहात आहे ही बाब सामनेवाला शाबित करू शकलेला नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही सध्या विवाहबाह्य संबंधामध्ये राहात आहे ही बाब शाबित झाल्याशिवाय तिला पोटगी नाकारता येणार नाही. याउलट, सामनेवाला अर्जदार क्र. १ हिच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याचे निष्पन्न होते. सदर बाबीवरून अर्जदार क्र. १ हिने सामनेवाल्याविरूध्द पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिला सामनेवाल्यापासून स्वतंत्र राहण्याकरीता संयुक्तिक असे कारण असल्याचे निष्पन्न होत आहे. अशा परिस्थितीत सामनेवाल्याने अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचेच निष्पन्न होत आहे. यास्तव मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २</u>** -

२९. अर्जदार क्र. १ हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, तिला उत्पन्नाचे साधन नसून ती व अर्जदार क्र. २ पूर्णपणे तिच्या माहेरच्या लोकांवर अवलंबून आहेत. अर्जदारांना सांभाळण्याची जबाबदारी सामनेवाल्याची असूनही सामनेवाला ती जबाबदारी पार पाडत नाही. सामनेवाला एस.टी. महामंडळ, रामवाडी, पेण येथे कामाला असून त्याला दरमहा रक्कम रू. ३०,०००/- ते ३५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीस ते पस्तीस हजार मात्र) इतका पगार आहे. सामनेवाल्याच्या घरी आई, विवाहित भाऊ व भावजय असे कुटुंब असून अर्जदार क्र. १ हिचा दिर व भावजय पनवेल येथे कामाला आहेत. तिची सासू शेतामधील भाजीपाल्याचे उत्पन्न घेऊन ती विकून स्वत:चा उदरनिर्वाह करते. त्यामुळे सामनेवाल्यावर अर्जदार क्र. १ व कु. तन्वी यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणाचीही जबाबदारी नाही. सबब, तिने सामनेवाल्याकडून तिच्याकरीता व अर्जदार क्र. २ करीता दरमहा प्रत्येकी रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा हजार मात्र) पोटगी म्हणून मिळण्याची मागणी केली आहे.

३०. सामनेवाल्याने त्याच्या उलटतपासामध्ये त्याने अर्जदार क्र. १ हिला दैनंदिन खर्चाकरीता कोणतीही रक्कम ती वेगळी राहात असल्यापासून दिलेली नसल्याचे मान्य केले आहे. त्याने घेतलेले कर्ज व त्याच्या परतफेडीपोटी तो रक्कम भरत असल्या संदर्भातील कागदोपत्री पुरावा त्याने दाखल केलेला नाही. त्याच्या वडीलांची गावी सामाईक शेती असून त्यातून भात पिकाचे उत्पन्न घेतले जात असल्याचे त्याने कथन केले आहे. तसेच त्याची आई ८-१५ दिवसांनी भाजी विकण्यासाठी जात असल्याचेही कथन त्याने केले आहे. सदर कामातून त्याच्या आईला उत्पन्न मिळत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सामनेवाला हा पती व वडील या नात्याने अर्जदारांचा सांभाळ करण्यास बांधील आहे. सामनेवाल्याने अर्जदार क्र. १ हिला तिच्या व्यवसायातून दरमहा रक्कम रू. ४०,०००/- ते ५०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चाळीस ते पन्नास हजार मात्र) इतके उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यासंदर्भातील कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच, सामनेवाल्यातर्फे तपासण्यात आलेल्या सा.क्र. २ ज्योती हिने ग्राहक आले तरच ती अर्जदार क्र. १ हिला कामासाठी बोलावून घेत असल्याचे मान्य करून ती अर्जदार क्र. १ हिला नियमितपणे कामासाठी बोलावत नसल्याचे कथन केले आहे. तसेच, ग्राहक कमी असल्याने अर्जदार क्र. १ हिला खूप काही उत्पन्न मिळत नसल्याचेही तिने मान्य केले आहे. यावरून अर्जदार क्र. १ हिला उत्पन्नाचा सबळ असा स्त्रोत नसल्याचेच दिसून येते.

३१. अर्जदार क्र. १ ही मुलीचा सांभाळ करीत असल्याने सामनेवाल्याने त्याबाबतची आर्थिक जबाबदारी उचलणे न्यायाचे ठरेल. सामनेवाल्याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची अगर पालनपोषणाची कोणतीही सोय केली नसल्याचे निदर्शनास येते. अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची जबाबदारी सामनेवाल्याचीच आहे. सामनेवाला हा शारिरीकदृष्ट्या सदृढ असून त्याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरीता

कोणतीही आर्थिक तरतुद केल्याचे निदर्शनास येत नाही. सबब, मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ व ४</u>** -

३२. मा. सर्वोच्च न्यायालयाने खालील न्यायनिवाड्यामध्ये पोटगी रकमेमागील उद्देश व ती ठरवत असताना कोणत्या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत याचे खालील न्यायनिवाड्यामध्ये विवेचन केलेले आहे.

***<u>Bhuwan Mohan Singh v. Meena & Ors (2014) Criminal Appeal No.1331 of 2014 S.L.P.No. 1565 of 2013 The Supreme Court of India</u>***

> *Section 125 of Cr.P.C. was conceived to alleviate the agony, anguish, and financial suffering of a woman who has left her matrimonial home for the reasons set forth in the provision so that the Court can make appropriate arrangements for her and her children if they are with her. The term "sustenance" does not always imply that one is living an animal's existence. She has the legal right to conduct her life in the same manner as she would have in her husband's home.*

***<u>Rajnesh V/s. Neha (2020) 2021 2 SCC 324, Supreme Court of India</u>***

सदर न्यायनिवाड्यामध्ये परिच्छेद क्र. १६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे,

> *The Court acknowledged that there was no straitjacket formula to calculate the quantum of maintenance. The Court noted that the same should balance the applicant spouse's interests with the responding spouse's financial competence. The Court outlined considerations to examine when determining the amount of maintenance to be paid. The following items were included on the list namely,*
> *1. The parties status,*

*2. The applicant's needs,*
*3. The respondent's income and property,*
*4.The claimant's liabilities and financial responsibilities,*
*5. The parties age and employments status,*
*6. The parties residential arrangements,*
*7. The parties minor children's maintenance, and*
*8. Illness or disability.*

***Basanta Kumari Mohanty vs Sarat Kumar Mohanty on 16 November, 1981, 1982 Cr.L.J. 485 (Ori.)***

> *Para No.7: No doubt an order Under Section 125 can be passed only if a person having sufficient means neglects or refuses to maintain his wife, child, parents etc. It is, however, well settled that the expression 'means' occurring in Section 125 does not signify only visible means, such as, real property or definite employment and if a man is healthy and able-bodied, he must be held to be possessed of means to support his wife, child etc. The Courts have gone to the extent of laying down that the husband may be insolvent or a professional beggar or a minor or a monk, but he must support his wife so long as he is able-bodied and can eke out his livelihood.*

***Deepa Joshi versus Gaurav Joshi reported in SLP (CRL.) No. 15662 of 2025*** wherein it has been held by the Hon'ble Supreme Court that,

> *16. The obligation of the husband to maintain his spouse is a primary and continuing duty, which must be discharged in a manner that enables the wife to live with dignity and in a standard commensurate with that enjoyed during the subsistence of the marriage. Viewed thus, deductions on account of asset-generating repayments cannot be permitted to substantially dilute the respondent's real earning capacity for the purpose of determining maintenance.*

३३. मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील न्यायनिवाड्यांमध्ये घालून दिलेली तत्वे विचारात घेता उभय पक्षकारांनी दाखल केलेली उत्पन्न व दायित्वाची प्रतिज्ञापत्रे विचारात घेणे आवश्यक आहे. अर्जदार क्र. १ हिने दाखल केलेले उत्पन्न व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र. २४) विचारात घेता तिचा सर्वसाधारण मासिक खर्च रक्कम रू. ३०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीस हजार मात्र) इतका असल्याचे नमुद केले आहे. तिच्यावर कु. तन्वी हिची जबाबदारी असून तिचा पालनपोषण व शिक्षणासाठी रक्कम रू. ५०,०००/- ते ६०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पन्नास ते साठ हजार मात्र) इतका खर्च येत असल्याचे नमुद केले आहे. सामनेवाल्याचे मासिक उत्पन्न रक्कम रू. ८०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये ऐंशी हजार मात्र) असून त्याचे स्वत:चे घर व जमीन मिळकत असल्याचेही नमुद केले आहे.

३४. सामनेवाल्याने नि.क्र. २५ कडे दाखल केलेल्या उत्पन्न व दायित्वाचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता त्याचा मासिक खर्च रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा हजार मात्र) इतका असल्याचे नमुद केले आहे. तो एम.एस.आर.टी.सी. एस.टी. वर्कशॉप, रामवाडी येथे नोकरीस असून त्याला दरमहा रक्कम रू. ४८,०००/- (अक्षरी रक्कम रूपये अठ्ठेचाळीस हजार मात्र) इतका पगार मिळतो. त्याची स्वत:च्या मालकीची कोणतीही मिळकत नसून वडीलोपार्जित मिळकतीमध्ये सात मिळकतदार असल्याचे त्याने कथन केले आहे. त्याच्यावर एस.टी. बँक खाते रक्कम रू. १२,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये बारा लाख मात्र) चे कर्ज असून त्याचा हप्ता रक्कम रू. २३,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तेवीस हजार मात्र) इतका आहे व आरूद्योग पतसंस्था, पेण येथील रक्कम रू. २,५०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पन्नास हजार मात्र) चे कर्ज असून त्याचा हप्ता रक्कम रू. ७,६००/- (अक्षरी रक्कम रूपये सात हजार सहाशे मात्र) इतका आहे.

३५. अर्जदार क्र. १ हिला उत्पन्नाचे कोणतेही सबळ असे साधन दिसून येत नाही. याउपर तिला अर्जदार क्र. २ हिचा सांभाळ व उभयतांच्या दैनंदिन गरजांकरीता खर्च अशी दुहेरी जबाबदारी पार पाडावी लागत आहे. पती व पिता म्हणून अर्जदारांची जबाबदारी सामनेवाला याचीच आहे. सामनेवाल्याने अर्जदारांच्या दैनंदिन उदरनिर्वाहाकरीता कोणतीही निश्चित तरतुद केल्याचे निदर्शनास येत नाही. सामनेवाल्याने नि.क्र. ५७ कडे दाखल केलेल्या माहे मे-२०२५ व एप्रिल-२०२५ च्या पगारपत्रकाचे अवलोकन करता त्यावेळी त्याला सर्व वजावट जाता रक्कम रू. ११,०००/- ते १२,०००/- (अक्षरी रक्कम रूपये अकरा ते बारा हजार मात्र) इतका पगार हातात मिळत असल्याचे दिसून येते. उत्पन्न व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्याने त्याला दरमहा रक्कम रू. ४८,०००/- (अक्षरी रक्कम रूपये अठ्ठेचाळीस हजार मात्र) इतका पगार मिळत असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे सामनेवाल्यास उत्पन्नाचा सबळ असा स्त्रोत असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत अर्जदार हे पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

३६. सामनेवाल्यावर अर्जदारांव्यतिरीक्त अन्य कोणाचीही जबाबदारी असल्याचे निदर्शनास येत नाही. सदर विवेचन व उभयतांचे उत्पन्न, दायित्व, राहणीमान व खर्च, अर्जदार क्र. २ हिचा शैक्षणिक, वैद्यकिय व इतर अनुषंगिक खर्च विचारात घेता सामनेवाल्याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा रक्कम रू. ३,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीन हजार मात्र) व अर्जदार क्र. २ हिला दरमहा रक्कम रू. ४,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चार हजार मात्र) इतकी पोटगी देणे न्यायोचित ठरेल. यास्तव मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर त्या अनुषंगाने अंशत: होकारार्थी देऊन मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. याचिका खर्चासहीत अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला याने प्रस्तुत याचिका दाखल तारखेपासून अर्जदार क्र. १ हिला दरमहा रक्कम रू. ३,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीन हजार मात्र) व अर्जदार क्र. २ हिला दरमहा रक्कम रू. ४,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चार हजार मात्र) इतकी पोटगी देण्याची आहे.

३. सदर पोटगी रकमेमध्ये इतर प्रकरणांत मंजूर झालेल्या पोटगी रकमेचा समावेश राहिल.

४. प्रस्तुत याचिकेचा खर्च रक्कम रु. १,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक हजार मात्र) सामनेवाल्याने अर्जदार क्र. १ हिला द्यावा.

५. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार क्र. १ हिला विनामुल्य द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर केला.)

AMRUTA AMOL SHINDE Digitally signed by AMRUTA AMOL SHINDE Date: 2026.05.22 17:36:51 +0530

दिनांक - २२.०५.२०२६

(अमृता अ. शिंदे)
न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, रायगड-अलिबाग